| MHKO140008142022 | **फौजदारी किरकोळ अर्ज २१९/२०२२**<br>**नि.क्र.१ खालील आदेश**<br>सोमाणा सतबा मुंगुरवाडकर वगैरे **वि.** ग्रामसेवक, ग्रामपंचायत बागीलगे, ता.चंदगड. |
|---|---|

अर्जदार यांनी सदरचा अर्ज अर्जदार यांची बहिण कै. कल्पना सतबा मुंगुरवाडकर यांच्या मृत्युची नोंद होऊन मिळावी यासाठी जन्म आणि मृत्यु नोंदणी कायदा, १९६९ मधील कलम १३(३) प्रमाणे केला आहे.

**<u>अर्जदाराचे कथन थोडक्यात असे की:</u>**

**(२)** अर्जदारांच्या कथनानुसार अर्जदार यांची बहिण कै. कल्पना सतबा मुंगुरवाडकर हिचे निधन दि.२०/०५/२००३ रोजी तसेच त्यांची मातोश्री रंगुबाई या बागिलगे येथे दि.२५/०९/२०२२ रोजी व अर्जदारांचे वडील सतबा हे दि.११/०५/१९९६ रोजी बागिलगे येथे मयत झाले. अर्जदार यांना कायद्याचे ज्ञान नसल्याने त्यांच्या अज्ञानपणामूळे आजतागायत त्यांची बहिण कल्पना हिची कोठेही मृत्यूची नोंद केली नाही. तद्नंतर अर्जदारने जाबदारकडे मृत्यूचा दाखला मिळणेसाठी दि.२१/१०/२०२२ रोजी अर्ज केला असता जाबदारांनी सदरची नोंद नाही म्हणून अनुपलब्धता प्रमाणपत्र दिले. अर्जदार यांना वारसा नोंदणीच्या सरकारी कामकाजास्तव मृत्यू दाखल्याची अवश्यक्ता आहे. म्हणुन अर्जदारांनी सदरील अर्जाद्वारे अर्जदार यांची बहिण कै. कल्पना सतबा मुंगुरवाडकर हिच्या मृत्युच्या नोंदीस झालेला विलंब योग्य ते शुल्क भरुन माफ करुन त्याप्रमाणे मृत्युची नोंद व्हावी यासाठी केला आहे.

**(३)** जाबदार यांना नि.क्र.६ प्रमाणे नोटीस बजावणी होऊनही हजर न झाल्याने सदर अर्ज त्यांचेविरुद्ध एकतर्फा चालविण्यात आलेला आहे.

**(४)** अर्जातील कथने, अर्जदार श्री. सोमाणा सतबा मुंगुरवाडकर, साक्षीदार श्री. दत्तात्रय रामु पाटील व श्री. जाणबा गोविंद पाटील यांचे सरतपासाचे शपथपत्र अनुक्रमे नि.क्र.९ ते ११ यांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, अर्जदार यांची बहिण कै. कल्पना सतबा मुंगुरवाडकर हिचे निधन दि.२०/०५/२००३ रोजी बागिलगे,

ता.चंदगड, येथे झाले आहे. अर्जदार यांची बहिण कै. कल्पना सतबा मुंगुरवाडकर हिच्या मृत्यूची नोंद आजतागायत कोठेही केली नाही. अर्जदारांकडुन अज्ञानाने मयताचे मृत्यूची नोंद करणेचे राहून गेले. तद्नंतर अर्जदाराने जाबदारकडे मृत्यूचा दाखला मिळणेसाठी अर्ज केला असता त्यांनी सदरची नोंद नाही म्हणून अनुपलब्धता प्रमाणपत्र दिले. त्याबाबतचे जाबदार यांचे अनुपलब्धता प्रमाणपत्र नि.क्र.१३, रंगुबाई यांचा मृत्यू प्रमाणपत्र नि.क्र.१४, दि.०३/१२/२०२२ रोजी दैनिक तरुण भारत या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली जाहीर नोटीस नि.क्र.१५ कडे केले आहे. अर्जदार यांच्या अर्जातील कथनास कोणीही हजर होऊन अक्षेप घेतलेला नाही. अर्जदार यांनी सादर केलेला पुरावा विना अहवानित राहिलेला आहे. जन्म आणि मृत्यु नोंदणी कायद्यानुसार कुठल्याही व्यक्तीच्या मृत्युची नोंद होणे आवश्यक आहे. अर्जदारांना तसा अर्ज करण्यास विलंब झाल्याने तो नियमाप्रमाणे विलंब शुल्क भरण्यास तयार आहे. कै. कल्पना सतबा मुंगुरवाडकर यांच्या मृत्युची अद्याप नोंद झालेली नाही, करीता जाबदार यांना कै. कल्पना सतबा मुंगुरवाडकर यांची मृत्युची नोंद करुन घेण्याचे आदेश पारीत करणे आवश्यक आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**:: आ दे श ::**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. ग्रामसेव, ग्रामपंचायत बागिलगे, ता. चंदगड, जि. कोल्हापूर यांनी कै.कल्पना सतबा मुंगुरवाडकर यांचा मृत्यु दि.२०/०५/२००३ रोजी झाल्याबाबतची नोंद कार्यालयातील दफ्तरी योग्य ते विलंब शुल्क आकारुन करून घेणेत यावी व तसा दाखला अर्जदार यांना देण्यात यावा.

DISTRICT COURT, MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by CHARUDATT UDDHAV SHIPKULE
Date: 2023.03.14 15:30:19 +0630

**ठिकाण–चंदगड**

**दिनांक–१४.०३.२०२३**

**(चारुदत्त उद्धव शिपकुले)**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चंदगड.**